**पूर्व उपक्रम – कोणतेही पाच समानार्थी शब्द लिहून त्याचे प्रत्येकी दोन प्रतिशब्द लिह**

अ. कवितेच्या ओळी पूर्ण करा.

१. आमच्या बाई एकाच शद्बाचे
अर्थ सांगतात तीन
अरण्याला म्हणतात त्या
वन, रान, विपिन
२. आश्चर्याला म्हणतात त्या
अचंबा, नवल, विस्मय
घराला म्हणतात त्या
सदन, निवास, आलय
३. मुलाला म्हणतात त्या
सुत , तनय, पुत्र
डोळ्याला म्हणतात त्या
नयन, लोचन ,नेत्र

**ब) यमक जुळणारे शब्द लिहा.**

१.तीन – विपिन २. पुत्र – नेत्र ३. क्षीर – नीर
४. दिनकर – रत्नाकर ५. बाई – आई

**क) कवितेत आलेले एका शब्दाचे तीन अर्थ लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) अरण्य - | वन | रान | विपिन |
| २ )आश्चर्य - | अचंबा | नवल, | विस्मय |
| ३ )घर - | सदन, | निवास | ,आलाय |
| ४) मुलगा – | सुत | तनय | पुत्र |
| ५) दूध – | दुग्ध | पय | क्षीर |
| ६ )पाणी – | जल | अंबू | नीर |
| ७) डोळा – | नयन | लोचन | नेत्र |
| ८) राजा – | भूप | नृप | नरेश |
| ९) सूर्य - | रवी | भास्कर | दिनकर |
| १0) समुद्र – | सागर | जलधी | रत्नाकर |
| ११) काळजी – | चिंता | विवंचना | फिकीर |
| १२) काळोख – | अंधार | तिमिर | तम |
| १३) माता – | जननी | माऊली | आई |

ई. वाक्यांचा डोंगर

सफरचंद

सफरचंद खातो.

राम सफरचंद खातो.

राम दररोज सफरचंद खातो.

राम दररोज सफरचंद कापून खातो.

**उ) पुढील शब्दांचे प्रत्येकी २-२ समानार्थी शब्द लिहा.**

१) अग्नी = आग अनल
२ )अलंकार = दागिना आभूषण
३) आकाश = नभ गगन
४) क्रोध = राग रोष
५) उपवन = बाग उद्यान
६) गाय = धे नु गौ
७) नदी = सरिता तटिनी

**पाठानंतरचा उपक्रम**

**कोणताही एक शब्द घेऊन वाक्य तयार करा व शब्दांचा डोंगर बनवा.**

.